जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५६ दिनांक - २२/०६/२०२३**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर**

# बकरी ईद व आषाढी एकादशी उत्सवा निमीत्त कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीत रुट मार्च काढण्यात आला

जून २०२३ मध्ये बकरी ईद व आषाढी एकादशी धार्मीक सण उत्सव येवु घातले आहेत. सदर सणाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न कोंढवा पोलीस ठाणे हद्दीत निर्माण होवु नये म्हणुन मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजन शर्मा, यांचे आदेश व मार्गदर्शनानुसार मा.सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री.शंभुराजे साळवे, यांचेसह वरिष्ठ पोलीस निरीक्षक,संतोष सोनवणे, व पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय मोगले व कोंढवा पोलीस ठाणे कडील ६ अधिकारी, ३० कर्मचारी, आर.सी.पी. ५, कोंढवा बीट मार्शल, सी.आर.मोबाईल, यांच्यासह कोंढवा पोलीस ठाणे हद्दीत कोंढवा पोलीस ठाणे- आर्शिवाद चौक -सत्यानंद हॉस्पिटल-कोर्णाक पुरम सोसायटी-बादशाह नगर सोसायटी-भैरवनाथ मंदिर-भिमनगर वसाहत-नरविर तानाजी मालुसुरे चौक (ज्योती हॉटेल चौक) या परिसरात रुट मार्च घेण्यात आला.

तसेच सदर रुट मार्च दरम्यान नागरीकांना कोणत्याही अफवावंर विश्वास ठेवु नये.अगामी सण मध्ये कुठलेही जातीय तेढ निर्माण होवु देवु नये तसेच पोलीस मदतीसाठी ११२ या नंबर कॉल करावा अशा सुचना देण्यात आल्या येणेप्रमाणे रुट मार्च राबविण्यात आला.

